किरकोळ फौजदार मुकदमा क. ३१/२०१५
श्रीमती प्रिती ज. चंद्रेश गांधी, २
..विरुध्द..
प्रेमकिशोर मोहनलाल गांधी, ३

आदेश निशाणी क. ३ खाली.
( दिनांक : १२/०४/२०१६ )

१. सदरचा अर्ज अर्जदाराने कलम २३(२) कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा २००५ नुसार अंतरीम खावटी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे अर्जाची थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे -
अर्जदार क. १ चे आई वडील कसबे आकोट ता. आकोट जि. अकोला येथे राहतात. गैरअर्जदार क. १ हे अर्जदार क. १ चे सासरे असून गैरअर्जदार क. २ ही सासू, गैरअर्जदार क. ३ हा दीर व गैरअर्जदार क. ४ ही देराणी आहे. अर्जदार क. १ चे लग्न गैरअर्जदार क. १ व २ यांचा मुलगा चंद्रेश प्रेमकिशोर गांधी यांचे सोबत दिनांक १०.१२.२००० रोजी क. आकोट, ता. आकोट, जि. अकोला येथे झाला होता. सदर लग्नामध्ये अर्जदार क. १ च्य वडिलांनी तिला स्त्रीधन म्हणून सोन्या- चांदी चे दागिने व लग्नाचे कपडे व नगदी रु. ५१,०००/- आणि भेटवस्तू आंदणाचे सामान रु. १,००,०००/- चे दिले होते. लग्न झाल्यानंतर अर्जदार ही लग्नात तिला आलेल्या भेटवस्तूंसह गैरअर्जदाराच्या एकत्रीत कुटुंबात, वडीलोपार्जीत घरात नांदण्यासाठी गेली. अर्जदार क. १ चे पती चंद्रेश हे अतिशय साध्या व भोळ्या स्वभावाचे होते. त्याचा गैरअफायदा घेवून गैरअर्जदार क. १ ते ४ यांनी अर्जदाराला घरामध्ये मोलकरणी सारखी वागणूक देवून तिचा शारिरीक व मानसीक छळ केला. तरी सुध्दा अर्जदार क. १ ही तिचे पतीसोबत सदर वडीलोपार्जीत घरातच नांदली. अर्जदार हिला तिचे पती चंद्रेश पासून अर्जदार क. २ व ३ ही अपत्य आहेत. दिनांक ०७.१०.२०१२ रोजी दुर्देवाने अर्जदार क. १ च्या पतीचे निधन झाले. चंद्रेश मरण पावल्या नंतर देखील अर्जदार क. १ ही तिच्या मुलांसह गैरअर्जदार क. १ ते ४ यांच्या सह वडिलोपार्जित घरात राहू लागली. परंतु अर्जदार क. १ चे पती चंद्रेश मरण पावल्यामुळे गैरअर्जदार क. १ ते ४ यांनी अर्जदार क. १ चा छळ सुरु करुन तिला आणखी त्रास देणे सुरु केले. गैरअर्जदारांनी अर्जदार क. १ जवळील सर्व स्त्रीधनाचे सामान व सोन्या चांदीचे दागीने तिचे पासून घेतले व हे सर्व दागदागीने गैरअर्जदार क. १व २ यांनी स्वतःचे ताब्यातच ठेवलेले आहेत.

३. अर्जदार क. १ हिने गैरअर्जदारांना तिचे सोन्या चांदीचे दागीने परत मागितले परंतु गैरअर्जदारांनी देण्यास नकार दिला. तसेच

गैरअर्जदार हे अर्जदार हिला टोमणे देवून वारंवार वाईट शब्दाने व तिरस्काराने बोलून मानसीक छळ करत असे. त्याचप्रमाणे तिचे पती मरण पावल्यामुळे गैरअर्जदार क. ३ स्वर्णेश हा अर्जदार क. १ ला वाईट नजरेने पाहू लागला. एकेदिवशी त्याने अर्जदार क. १ च्या खोलीमध्ये येवून अर्जदार क. १ सोबत लगटपणा करुन तिचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. घडलेल्या घअनेबाबत तिने सासू हिला सांगितले तरी सुध्दा अर्जदार हिला संरक्षण देण्याचे ऐवजी तिचा छळ करणे गैरअर्जदारानी चालू केले व दिनांक ०८.०४.२०१३ रोजी गैरअर्जदारांनी अर्जदार हिला मारपीट करुन तिचे मुलाबाळांसह बळजबरीने घराचे बाहेर काढून दिले. तेव्हा अर्जदार क. १ ही अर्जदार क. २ व ३ यांचेसह तिच्या वडिलांचे आश्रयाने कसबे आकोट येथे राहत आहे. अशा परिस्थितीत आज रोजी अर्जदाराजवळ उत्पन्नाचे कुठलेही साधन नाही. तिला तिचे व मुलांचे शिक्षण, खाणेपिणे करणे अशक्य आहे. अर्जदार व तिचे मुले तिचे वडीलांच्या सहानुभूतीवर कशी तर जगत आहे.

४. अर्जदाराचे पुढे असेही कथन आहे की, स्व. चंद्रेश गांधी हयांची संपुर्ण वडिलोपार्जीत शेती, घर व इतर मालमत्ता व व्यवसाय हा गैरअर्जदार क. १ व ३ चे ताब्यात असून त्या संपुर्ण मालमत्तेपासून मिळणारे सर्व उत्पन्न गैरअर्जदार क. १ व ३ यांच्या जवळ असून त्या उत्पन्नाचा उपभोग गैरअर्जदार क. १ ते ४ हेच करीत आहेत. गैरअर्जदारांनी अर्जदारांना आज पर्यंत त्या उत्पन्नातून एक पैसाही दिलेला नाही. गैरअर्जदारांच्या ताब्यात करोडो रुपयांची वडिलोपार्जीत मालमत्ता आहे. त्या संपुर्ण मालमत्तेमध्ये स्व. चंदेशचे वारसदार म्हणून अर्जदार क. १ ते ३ यांचा हिस्सा आहे. म्हणून सदर मालमत्तेच उत्पन्नाची अर्जदारांच्या हिश्याची रक्कम अर्जदारांना गैरअर्जदार क. १ व ३ पासून मिळणे आवश्यक आहे. त्याचप्रामण गैरअर्जदार क. १ हे अर्जदार क. १ चे सासरे असल्यामुळे व अर्जदार क. २ व ३ चे आजोबा असल्यामुळे अर्जदारांना गैरअर्जदार क. १ पासून खावटीची रक्कम मागण्याचा पुर्ण हक्क व अधिकार आहे. त्यामुळे गैरअर्जदार क. १ व ३ पासून अर्जदार क. १ करिता रु. १५,०००/-, अर्जदार क. २ करिता रु. १३,०००/- व अर्जदार क. ३ करीता रु. १२,०००/- अशी एकूण दरमहा रु. ४०,०००/- तसेच राहण्यासाठी घरभाडे दरमहा रु. ५०००/- अशी रक्कम, तिचे मुले व तिचे संगोपन, शिक्षण इत्यादीसाठी अंतरीम खावटी मंजुर करण्याची विनंती केली.

५. गैरअर्जदाराने निशाणी १४ वर जबाब दाखल केला असुन अर्जदाराचे कथन पुर्णपणे नाकारले आहे व अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

६. अर्जदार व गैरअर्जदार तर्फे त्यांचे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

७. अर्जाचे व अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, गैरअर्जदार क. १ ते ४ यांनी अर्जदार क. १ चे पतीचे निधना नंतर तिचा शारिरीक व मानसीक छळ केला व तिला अर्जदार क. २ व ३ यांच्यासह घराच्या बाहेर काढून दिले. तसेच तिला लग्नात आलेले सर्व दागदागिने गैरअर्जदारांनी स्वतः जवळ ठेवून घेतले व गैरअर्जदारांनी अर्जदारांच्या दागिने गहाण ठेवून त्यावर बॅंकेचे कर्ज घेतले आहे. तसेच गैरअर्जदार व अर्जदाराचे पती चंद्रेश यांची वडीलोपार्जीत व सामायीक अनेक बंगले, मकान व प्लॉट मौजे दारव्हा येथे आहेत. त्यांच्या मालमत्तेतील काही दुकाने भाडयाने दिले आहेत.

८. अर्जदाराने अभिलेखामध्ये दाखल केलेले दस्तऐवजांवरुन दिसून येते की, गट क. १४५/३ मौजे दारव्हा येथे अर्जदार व गैरअर्जदार क. २ यांच्या नावाने २३२ चौ.मी. चा प्लॉट आहे. तसेच गट ११८/२ब मध्ये २२९ चौ.मी. प्लॉट अर्जदार व गैरअर्जदार क. २ च्या नावाने आहे व सदर प्लॉट हे गैरअर्जदार क. १ व २ यांच्या ताब्यामध्ये आहे. तसेच अभिलेखामध्ये अर्जदाराने गैरअर्जदार हा हनुमान इंडस्ट्रि नावाने दालमिल चालवितो त्याबाबत ७/१२ चा उतारा दाखल केला आहे. तसेच अर्जदाराने गट क. २२१/०१ब मध्ये १ हे. ६६आर जमिन गैरअर्जदार क. १ च्या नावाने आहे. तसेच गट क. २१६/३ मध्ये ५ हे. १९ आर गैरअर्जदार क.१ च्या नावाने आहे.

९. अभिलेखावरुन व अर्जावरुन असे दिसते की, सर्व मालमत्ता ही वडीलोपार्जीत मालकीची असल्यामुळे अर्जदार क. १ चे पती चंद्रेश यांचा सर्व वडिलोपार्जीत मालमत्तेत हिस्सा आहे व या सर्व मालमत्तेच्या उत्पन्नामध्ये मयत चंद्रेशचा हिस्सा आहे. अर्जदार क. १ ते ३ हे चंद्रेशचे वारस असल्यामुळे यांचा चंद्रेशच्या मालमत्तेत वारसाहक्क आहे. परंतु आज रोजी वरील मालमत्तेचा गैरअर्जदार हेच उपभोग घेत आहेत. अभिलेखावरुन असेही दिसते की, गैरअर्जदार क. १ ते ४ यांनी अर्जदार ही जेव्हा पासून माहेरी राहते तेव्हापासून गैरअर्जदारांनी तिला कोणतेही आर्थिक सहाय्य केले नाही व तिची कोणतीही काळजी घेतली नाही. अर्जदार क. १ ही मयत चंद्रेश ची पत्नी व गैरअर्जदार क. १ व २ यांची सून असल्याच्या नात्याने व अर्जदार क. २ व ३ हे मयत चंद्रेशचे अपत्ये असून गैरअर्जदार क. १ व २ चे नातू असल्याच्या नात्याने त्यांचे पालनपोषण करणे ही गैरअर्जदारांची नैतीक जबाबदारी आहे.

१०. अर्जदार हिला उदरनिर्वाहासाठी कोणतेही साधन नाही. गैरअर्जदारांवरती अर्जदार व तिचे मुले यांच्याशिवाय कोणाचिही पालनपोषणाची जबाबदारी नाही. तसेच गैरअर्जदारांकडे असलेल्या वडिलोपार्जीत मालमत्तेवर मयत चंद्रेशचा वारसाहक्काने मालकीहक्क व सामायीक ताबा आहे. त्यावरुन मयत चंद्रेशचे वारस म्हणून अर्जदार क. १ ते ३ यांना गैरअर्जदार क. १ ते ४ हे त्यांना मिळणा-या उत्पन्नामधून अंतरीम पोटगी देउ शकतात. या प्रकरणाची सध्याची स्थिती लक्षात घेता व सध्या प्रकरणाचे गांभिर्य लक्षात घेता माझ्या मते अर्जदार दरमहा रु. ३,०००/- व अर्जदार क. २ व ३ प्रत्येकी रु. २०००/- अंतरीम पोटगी मिळणेस पात्र आहे. म्हणुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज नि.क.०३ अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदार क. १ यांनी अर्जदार क. १ हीला दरमहा रु. ३०००/- ( तीन हजार रुपये ) आणि अर्जदार क. २ व ३ यांना प्रत्येकी दरमहा रु. २०००/- ( दोन हजार रुपये ) अंतरीम पोटगी, अर्ज (नि.क.०३) दाखल तारखेपासुन म्हणजे दिनांक १९.०१.२०१५ दयावी.

दिनांकः १२/०४/२०१६. ( वि.नि. मोरे )
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, अकोट

# Certificate

I affirm that the contents of this P.D.F. File are same word for word as per original order.

Name of Steno - Sau. A.M.Sathe

Court Name - Jt.C.J.(J.D.) & J.M.F.C. Akot

Date - 12/04/2016

Signed by Presiding Officer on - 12/04/2016

Uploaded on - 13/04/2016